**ठळक बातम्या**

- दिल्लीत लाल किल्ला परिसरात स्फोट घडवून आणणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असा प्रधानमंत्र्यांचा इशारा

- सहाव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांमधे जलसंवर्धन आणि व्यवस्थापनात सर्वोत्तम राज्याचा पुरस्कार महाराष्ट्राला जाहीर

- राज्य सरकार न्यायालयं आणि न्यायाधीशांच्या निवासस्थानी अतिरिक्त ८ हजार २८२ सुरक्षारक्षक नियुक्त करणार, पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवालाच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढवायला मंत्रिमंडळाची मंजुरी

**आणि**

- राज्यातल्या विविध महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी आरक्षण सोडत जाहीर

**<><><><><>**

दिल्लीत लाल किल्ला परिसरात स्फोट घडवून आणणाऱ्या दोषींवर अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. भूतान इथं एका कार्यक्रमात ते बोलत होते. काल रात्रीपासून स्फोटाचा तपास करणाऱ्या यंत्रणांकडून सातत्यानं माहिती घेत असून या स्फोटामागच्या खऱ्या सुत्रधाराला तपास यंत्रणा शोधून काढतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संपूर्ण देश स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांसोबत असल्याचं मोदी यांनी सांगितलं.

**- - -होल्ड बाईट मोदी - - -**

लाल किल्ला इथल्या स्फोटानंतर परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक झाली. शहा यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीला केंद्रीय गृह सचिव, गुप्तचर विभागाचे प्रमुख,

दिल्ली पोलिस आयुक्त, राष्ट्रीय तपास संस्थेचे महासंचालक उपस्थित होते. जम्मू आणि काश्मिरचे पोलीस महासंचालक या बैठकीला दूरस्थ पद्धतीनं उपस्थित होते.

लाल किल्ला मेट्रो स्थानकाजवळ एका गाडीत काल संध्याकाळी सातच्या सुमारास एक शक्तीशाली स्फोट झाला. या दुर्घटनेत आठ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले.

<><><><><>

या बॉम्बस्फोट प्रकरणाचा तपास NIA, अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेकडे द्यायचा निर्णय केंद्रीय गृहमंत्रालयानं आज घेतला. काल झालेल्या बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या निवासस्थानी झालेल्या उच्चस्तरीय सुरक्षा आढावा बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

<><><><><>

सहाव्या राष्ट्रीय जल पुरस्कार केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी आज जाहीर केले. जलसंवर्धन आणि  व्यवस्थापनात सर्वोत्तम राज्याचा पुरस्कार महाराष्ट्राला जाहीर झाला आहे. गुजरात आणि हरियाणाला अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहेत. सर्वोत्तम नागरी स्थानिक स्वराज संस्था या श्रेणीत नवी मुंबई महानगरपालिकेला प्रथम क्रमांक मिळाला आहे. सर्वोत्तम पाणी वापरणारी संस्था श्रेणीत  नाशिकच्या काफिनाथ संस्थेला दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

नवी दिल्लीत विज्ञान भवन इथं १८ नोव्हेंबरला पुरस्कार प्रदान सोहळा होणार असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कार  दिले जाणार आहेत. पुरस्कार विजेत्यांना प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख रक्कम पुरस्कार म्हणून दिली जाणार आहे.

<><><><><>

राज्यातल्या न्यायालयांचा परिसर, तसंच न्यायाधीशांच्या निवासस्थानांच्या सुरक्षेसाठी अतिरिक्त ८ हजार २८२ सुरक्षारक्षक नियुक्त करायला राज्य मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंत्रिमंडळानं हा निर्णय घेतला. हे सुरक्षारक्षक महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून उपलब्ध करून घेतले जातील. त्यांच्या वेतनासाठी आवश्यक ४४३ कोटी २४ लाख ८४ हजार ५६० रुपयांच्या तरतुदीला मंत्रिमंडळानं मान्यता दिली.

पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवालाच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढवायलाही मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. त्यानुसार अंमलबजावणीचा कालावधी १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत राहणार आहे.

नाशिक, नागपूर, आणि धाराशिव या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना ८२७ कोटी रुपयांचं शासकीय भागभांडवल द्यायला, तसंच हिंगोलीतल्या डिग्रस साठवण तलावासाठी ९० कोटी ६१ लाख रुपयांच्या तरतुदीला मंत्रिमंडळानं मान्यता दिली. हिंगोली जिल्ह्यात सेनगांव तालुक्यातल्या सुकळी साठवण तलाव प्रकल्पाला, तसंच त्यासाठी १२४ कोटी ३६ लाख रुपयांची तरतुद करालाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली.

**<><><><><>**

छत्तीसगढ-महाराष्ट्र सीमेवरच्या बस्तर, बिजापूर आणि गडचिरोली जिल्ह्यात असलेल्या जंगलात आज सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांची चकमक झाली. या चकमकीत सहा नक्षलवादी ठार झाल्याची माहिती सुरक्षा दलानं दिली. जिल्हा राखीव सुरक्षा रक्षक, कोब्रा कमांडो आणि स्थानिक पोलिसांनी संयुक्तरित्या ही कारवाई केली.

**<><><><><>**

राज्यातल्या विविध महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी आज आरक्षण सोडती जाहीर झाल्या.

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या** २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी एकसदस्यीय प्रभाग प्रद्धतीनुसार आरक्षण निश्चिती आणि सोडत आज वांद्रे इथल्या बालगंधर्व रंगमंदिराच्या सभागृहात काढण्यात आली. एकूण २२७ जागांपैकी अनुसूचित जातीसाठी १५, अनुसूचित जमातींसाठी २, तर नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी ६१ जागा राखीव ठेवल्या आहेत. ११४ जागा महिलांसाठी राखीव असून त्यापैकी अनुसूचित जातींसाठी ८, अनुसूचित जमातींसाठी १, तर नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलांसाठी ३१, आणि ७४ जागा सर्वसाधारण महिलांसाठी राखीव आहेत.

**नवी मुंबई** महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी चार सदस्यीय प्रभाग रचना निश्चित केली आहे. त्यानुसार १११ सदस्यसंख्येकरिता २८ प्रभाग आहेत. त्यापैकी एक प्रभाग तीन सदस्यीय झाला आहे. १११ सदस्यांपैकी एकूण ५६ महिला सदस्य असतील आणि प्रत्येक प्रभागात किमान दोन महिला सदस्य संख्या लक्षात घेऊन हे आरक्षण काढलं आहे.

**ठाणे महानगरपालिकेच्या** सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती महिला- प्रवर्गासाठी ५, अनुसूचित जमाती महिला- प्रवर्गासाठी २, मागास प्रवर्ग- महिलांसाठी १८, आणि सर्वसाधारण महिला प्रर्वगातील ४१ जागांची सोडत काढण्यात आली. महापालिकेच्या एकूण १३१ पैकी, अनुसूचित जातींसाठी ९, अनुसूचित जमातींसाठी ३, मागासवर्ग प्रवर्गासाठी ३५ जागा आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी ८४ जागा आहेत. एकूण १३१ जागांपैकी महिलांसाठी ६६ जागा आरक्षित आहेत.

**नागपूर** महापालिकेच्या आगामी निवडणुकांसाठी आज जाहीर झालेल्या आरक्षण सोडती मध्ये एकूण १५१ जागांपैकी ५० टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या आहेत. त्यामुळे यंदा महापालिकेत यंदा ७६ नगरसेविका आणि ७५ नगरसेवक असं प्रतिनिधित्व असेल. पालिकेचे एकूण ३८ प्रभाग असून त्यापैकी ३७

प्रभागांमध्ये प्रत्येकी चार सदस्य, तर ३८ क्रमांकाच्या प्रभागात तीन सदस्य असणार आहेत.

**छत्रपती संभाजीनगर** महानगरपालिका निवडणुकीसाठी आज सोडत जाहीर झाली. त्यात ११५ सदस्यांपैकी ५८ जागा महिलांसाठी तर इतर मागास प्रवर्गासाठी ३१, अनुसूचित जातीसाठी २२ आणि अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी २ जागा आरक्षित आहेत.

**परभणी** महानगरपालिकेतल्या १६ प्रभागांसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि सर्वसाधारण- महिला तसंच सर्वसाधारण अशा प्रवर्गांचं आरक्षण निश्चित करण्यात आलं.

**धुळे** महापालिकेच्या १९ प्रभांगापैकी १८ आणि १९ हे दोन प्रभाग लोकसंख्येच्या प्रमाणानुसार तीन-तीन सदस्यांचे असून उर्वरित १७ प्रभाग हे ४-४ सदस्यांचे निश्चित केलेत. १९ प्रभागांतील ७४ जागांपैकी ३७ जागा महिलांसाठी राखीव आहेत.

**सोलापूर महानगरपालिकेच्या** २६ प्रभागासाठी आरक्षण सोडत आज हुतात्मा स्मृती मंदिर इथं काढण्यात आली. यात १०२ पैकी ५१ जागा वेगवेगळ्या जाती प्रवर्गातील महिलांसाठी राखीव ठेवल्या आहेत.

**जालना महानगरपालिकेच्या** आगामी निवडणुकीसाठी प्रभागनिहाय आरक्षण सोडत आज जिल्हाधिकारी कार्यालयातल्या सभागृहात जाहीर झाली. यात १६ प्रभागातल्या एकूण ६४ नगरसेवक पदांसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि सर्वसाधारण वर्गांसाठी आरक्षण निश्चित करण्यात आलं.

**नांदेड महापालिकेच्या** सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण आज जाहीर झाली. यात एकूण ८१ नगरसेवकापैकी ४१ महिला नगरसेवक राहणार आहेत. अनुसूचित जातीच्या एकूण १५ जागापैकी ८ जागा या महिलांसाठी, अनुसूचित

जातीच्या दोन जागांपैकी एक जागा महिलेसाठी, मागास प्रवर्गासाठी २१ पैकी ११ महिला आणि खुल्या प्रवर्गातील ४३ पैकी २१ महिला सदस्यांसाठी आरक्षण काढण्यात आलं.

**लातूर महानगरपालिकेच्या** एकूण ७० जागांसाठी आरक्षण जाहीर करण्यात आलं.  यातील ३५ जागा महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.

**चंद्रपूर** महानगरपालिकेच्या प्रभाग आरक्षण सोडत आज जाहीर झाली. एकूण ६६ जागांपैकी ३३ जागा महिलांसाठी आरक्षित ठेवल्या आहेत.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात राज्यात सर्व ठिकाणी हवामान कोरडं राहील, मात्र कोकणात बऱ्याच ठिकाणी, मराठवाड्यात काही ठिकाणी, तर विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट होण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//